Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक १७ ] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १०-१६, २०२०/भाद्रपद १९-२५, शके १९४२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८८.

### संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक वि.यो. खामगांव (सु) कलम-१२७(२)-अधिसूचना-टिपीव्ही-६-२०३७-२०२०.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे “उक्त अधिनियम” असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) अन्वये खामगांव या “ ब ” वर्ग नगरपरिषदेची सुधारित विकास योजना (यापुढे “उक्त विकास योजना” असे संबोधिलेली) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिसूचना क्रमांक वि.यो. खामगांव (सु) -टिपीव्ही-६-२५६२, दिनांक ३० एप्रिल १९९२ अन्वये मंजूर केली आहे व ती दिनांक ०१ नोव्हेंबर १९९३ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे “उक्त विकास योजना” असे संबोधलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. खामगांव येथील स.नं. ११६ (भाग) मध्ये ० ८० हे. क्षेत्र, आ.क्र. ०४ “बगिचा” व ० ६० हे. क्षेत्र आ.क्र.१२ “प्राथमिक शाळा” (यापुढे “उक्त आरक्षणे” असे संबोधिलेले आहे.) यासाठी प्रस्तावित करण्यात आले असून, त्यासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, खामगांव आहे (यापुढे “उक्त समुचित प्राधिकरण” असे संबोधिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरण यांनी विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणांखालील जागेचे संपादन केलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, स.नं. ११६/२ मधील १ ९२ हे. जागेचे मालकांनी दिनांक १५ ऑक्टोबर २००४ रोजीच्या अर्जान्वये उक्त समुचित प्राधिकरणावर, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) अन्वयेची सूचना बजावली होती आणि सदर सूचनेची प्रत सध्याचे संबंधित जमीन मालक श्री. गाडोदीया यांनी दिनांक ०९ मे २००६ रोजीच्या पत्रान्वये खामगांव नगर परिषदेला देऊन अधिनियमाचे कलम १२७ बाबत कार्यवाही करावी अशी विनंती केली आहे (यापुढे यांस “उक्त खरेदी सूचना” असे संबोधिलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, शासनाने विधि व न्याय विभागाचे अभिप्रायानुसार दिनांक १६ फेब्रुवारी २०१९ रोजीचे पत्रान्वये उक्त सूचना दिनांक ०९ मे २००६ पासून ग्राह्य समजून तद्नंतर विहित कालावधीत भूसंपादनाची अधिसूचना निर्गमित न झाल्याने अधिनियमाचे कलम १२७ नुसार कार्यवाही करण्याबाबत संचालनालयास कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, स.नं. ११६/२ मधील ० ८० हे. जमीन, आ.क्र.०४ "बगिचा" व ० ६० हे.जमीन, आ.क्र.१२ "प्राथमिक शाळा" या आरक्षणांनी बाधित होत आहे (यापुढे "उक्त जागा" असे संबोधिलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) अन्वयेची सूचना प्राप्त झाल्यापासून ०६ महिन्यांच्या कालावधीत, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त जागा संपादन केलेली नाही किंवा ती संपादन करण्यासाठी कोणतीही कार्यवाही सुरू केलेली नाही किंवा सूचना प्राप्त दिनांक ०९ मे २००६ पासून ०६ महिन्यांचे आत अधिनियमाचे कलम १२७ (१) अंतर्गत नमूद भूसंपादनाची अधिसूचना निर्गमित केलेली नाही याची खात्री झाल्यावरून उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) नुसार उक्त आरक्षणे पूर्णतः व्यपगत झालेली असून, उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (२) नुसार, उक्त जागेच्या क्षेत्रापुरती उक्त आरक्षणे पूर्णतः व्यपगत झाल्याबाबत अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक आहे असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्रमांक टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र. ५०८-नवि-१३, दिनांक १-१२-२०१६ अन्वये सर्व नगरपालिका / नगर पंचायती आणि जिल्हा परिषद नियोजन प्राधिकरण असलेल्या विकास योजना संबंधाने,उक्त अधिनियमाचे कलम १२७ पोट-कलम (२) अन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उपकलम (२) बाबत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारात संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या अधिसूचनेन्वये खामगांव शहराच्या मंजूर सुधारित विकास योजनेतील आ. क्र. ०४ "बगिचा" व आ. क्र. १२ "प्राथमिक शाळा" ही आरक्षणे उक्त जागेपुरती (खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे) पूर्णतः व्यपगत झाल्याबाबत अधिसूचित करीत असून, सदर मुक्त झालेली जागा, लगतच्या जमिनीवर उक्त विकास योजनेनुसार अन्यथा अनुज्ञेय होणा-या विकासाच्या प्रयोजनासाठी, जमीन मालकास विकासाकरकीता उपलब्ध होईल.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | मौजे, तालुका व जिल्हा | विकास योजनेतील आरक्षण व वि. यो. अहवालानुसार क्षेत्र | ग.नं./स.नं. | आरक्षणातून व्यपगत झालेल्या भागाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | हे. आर |
| १ | मौजा खामगांव, ता. खामगांव, जि. बुलडाणा. | आ. क्र. ०४ "बगिचा" (० ८० हे.) | ११६/२ | ० ८० |
| | | आ. क्र. १२ "प्राथमिक शाळा" (० ६० हे.) | ११६/२ | ० ६० |

उक्त आरक्षणातून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणा-या भाग नकाशाची प्रत मुख्याधिकारी, खामगांव नगर परिषद यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत ठेवण्यात येत आहे.

सदर आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर **www.dtp.maharashtra.gov.in** देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सुधाकर नांगनुरे,**

पुणे :
दिनांक २० ऑगस्ट २०२०.

संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८९.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. D.P.Khamgaon(R)-Sec-127(*2*)-Notification-TPV-VI-2037-2020.—

Whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* its Notification No. D.P.Khamgaon(R)-TPV-6-2562, dated 30-04-1992 has sanctioned the Revised Development Plan of Khamgaon (hereinafter referred to as the "said Development Plan") under Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and the same has come into force with effect from date 01-11-1993;

And whereas, in the said Development Plan, from S. No. 116 (part) of Khamgaon the land admeasuring 0.80 Hect., is reserved for Site No. 04 "Garden"and Land admeasuring 0.60 hect., is reserved for Site No. 12 "Primary School"(hereinafter referred to as "the said Reservation") for which Appropriate Authority is Municipal Council, Khamgaon (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land under said reservation has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force;

And whereas, the owners of 1.92 Hect. land from S. No.116/2 had served a Notice uner Section 127 *(1)* of the said Act, on the said Appropriate Authority *vide* their letter dated 15-10-2004 & the present land owner Shri.Gadodiya has given the copy of the said notice to Khamgaon Municipal Council *vide* his letter date 09-05-2006 & requested to do the necessary action under Section 127 of the the said Act (hereinafter referred to as "the said Notice");

And whereas, after taking the remarks of Law & Judiciary Department, the Government has connunicated to the directorate *vide* its letter dated 16-02-2019 that, the said notice is considered to be vilid from date 09-05-2006 and also communicated that since the notification for land acquisition has not issued within prescribed time limit from said valid notice, the necessary action uder Section 127 of the said Act shall be carried out;

And whereas, land from S. No. 116/2 admeasuring 0.80 Hect. is affeced by Site No. 04 "Garden"& 0.60 Hect. is affected by Site No. 12 "Primary School" (hereinafter referred to as "the said Land");

And whereas, after confirming that, the said Appropriate Authority, has not acquired or no steps as contemplated in the Section 127 *(1)* of the said Act, has commenced for its acquistion within the period of Six months from the receipt of the aforesaid notice or notification of land acquisition under Section 127of the said Act has not been issued within six months after receipt of notice on 09-05-2006 , the Director of Town Planing is now of the opinion that in accordance with the provision of Section 127*(1)* of the said Act, the said Reservation, pertaining to the said land, has lapsed fully and it is accordingly expedient to notify such lapsing under Section 127 *(2)* of the said Act;

And whereas, the Government in Urban Development Department under Section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 01-12-2016, has delegated the powers exercisable by it under Section 127 (*2*) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils-*Nagar Panchayats* and for the development plans undertaken by Zilla Paridhad as a PlanningAughority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, in exercise of the powers delegated by the government, in respect of Sub-section (*2*) of Section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Director of Town Planning, Maharashtra

State, Pune, hereby notfies that the said Reservation of Site No. 04 “Garden” & Site No. 12 “Primary Shcool” are lapsed fully only in respect of said Land (as specified in the Schedule herein below) and the said land shall become available to the land owners for the purpose of Development as otherwise, permissible in the case of adjacent land, under the said Development Plan.

SCHEDULE

| Sr. No. | Mauja, Tal., Dist. | Reservation of Development Plan & its Area as per D. P. Report | City Survey No./ Gut No. | Area of the lapsed part of the Reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Mauja Khamgaon, Taluka Khamgaon, Dist. Buldana. | Site No. 04 “Garden” (0.80 Hect.) | S. No. 116/2 | 0.80 Hect. |
| | | Site No. 12 “Primary School” (0.60 Hect.) | S. No. 116/2 | 0.60 Hect. |

A Copy of the part paln showing the area which is lapsed from the said reservations, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Khamgaon during office hours on all working days for inspection to public up to one month.

This Order shall also be published on the Directorate web site *www.dtp.maharashtra.gov.in.*

SUDHAKAR NANGNURE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 20th August 2020.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.